Volume - 6 (2025)
Special Issue - 1 (March)
**RESEARCH HUB**
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN
2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# वर्तमान राजकीय उत्थानासाठी आंबेडकरी नेतृत्वाची भूमिका

**संशोधक**
**विनेश दामोधर खोब्रागडे**

**मार्गदर्शक**
**डॉ. राष्टपाल एस. गणवीर**
प्राध्यापक तथा विभाग प्रमुख राज्यशास्त्र विभामहिला महाविध्यालय नंदनवन नागपुर.

---

**_सारांश :_**

*आंबेडकरी नेतृत्व पँथरच्या उदयासाठी १९७०च्या वेळी जी परिस्थिती होती, नेमकी तशीच वर्तमान परिस्थिती आज दिसत नाही पण नवीन नेतृत्व उदयाला येताना दिसत नाही. या नेतृत्वाला एवढा क्रांतिकारी वारसा असताना असे का व्हावे? चळवळीतून नेतृत्व उभे का राहत नाही? यासाठी संपूर्ण आंबेडकरी समाज जबाबदार आहे. वर्तमान आंबेडकरी समाज फार मोठ्या संभ्रमात सापडला आहे. आंबेडकरी नेतृत्व संपले असा युक्तिवाद काही मंडळींनी सुरू केला आहे. विधानसभा आणि लोकसभेच्या निवडणुकीत आंबेडकरी समाज पक्षाचा एकही उमेदवार निवडून आला नसल्याने वरील युक्तिवाद जोरकसपणे मांडला जात आहे. म्हणून खरेच हे आंबेडकरी नेतृत्व संपले का, हे तपासणे महत्त्वाचे आहे. एक बाब लक्षात ठेवणे आवश्यक आहे आणि ती म्हणजे जगातील कुठलेही राजकीय नेतृत्व कायम गतिमान राहू शकत नाही. राजकीय नेतृत्वात चढउतार असतात. नेतृत्वाचे संदर्भ, आणि नेतृत्व बदलत राहतात. आंबेडकरी नेतृत्व दिशाहीन झाले हे वादातीत आहे; पण याचे खापर फक्त नेत्यांवर फोडून कसे चालेल? याला आंबेडकरी नेतृत्वाचे सर्व घटक जबाबदार असतात. अलीकडे वतर्मान काळात लोक आंबेडकरी चळवळ सहभागी होत नाहीत असे प्रकर्षाने जाणवते. असे का होते? या प्रश्नाच्या उत्तरासाठी आपण नेतृत्वाचा सिद्धांत काय सांगतो ते बघू. लोक पुढील कारणांमुळे/ उद्देशांमुळे चळवळी सहभागी होतात.*

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुक्तीसाठी जे विचार आपल्या ग्रंथांद्वारे आणि भाषणांद्वारे अभिव्यक्त केलेले होते, त्या सर्व विचारावर आंबेडकरी नेतृत्व निर्माण करणे आवस्यक आहे.

२) व्यवहाराला विचारांचे पाठबळ नसेल तर नेतृत्व दिशाहीन होण्याचा फार मोठा धोका असतो म्हणून विचारांचे पाठबळ आवश्यक असते.

३) राजकीय सत्तेत सहभागासाठी तत्त्वप्रणालीं आवश्यक असते यावरच सारे लक्ष केंद्रित झालेले असते.

राजकीय चळवळीच्या सहभागा विषयी वरील प्रकारचे निकष आंबेडकरी नेतृत्वाला लावून बघा म्हणजे **वर्तमान** आजचे आंबेडकरी नेतृत्व दिशाहीन का झाले, याची उत्तरे आपोआप हाती लागतील.

**कीवर्ड :** आंबेडकरी नेतृत्व, राजकीय, सामाजिक, आर्थिक, चळवळ

---

**प्रस्तावना:**

आंबेडकरी नेतृत्वाची अस्मिता निर्माण झाली. (या अस्मितेला अनेक विभाग आहेत, ही गोष्ट वेगळी.)

मग पुढे आंबेडकरी नेतृत्वाचे काय प्रयोजन? सामाजिक प्रक्रियेतून निर्माण केलेली अस्मिता शाश्वत स्वरूपात ठेवण्यासाठी सुद्धा सामुदायिक पद्धतीने प्रयत्न सुरू असले पाहिजेत. याचा विसर आंबेडकरी नेतृत्वाला पडला आहे, असे ध्यानात येते.आज संपूर्ण भारतीय समाजाचे संदर्भ व प्रश्न बदलले आहेत; पण आंबेडकरी नेतृत्वाचा अजेंडा भावनिकतेच्या व आक्रस्ताळेपणाच्या बाहेर यायला तयार नाही. खाजगीकरण व जागतिकीकरणामुळे हे संदर्भ बदलले आहेत. परिणामी खाऊजा (खाजगीकरण- उदारीकरण-जागतिकीकरण) धोरणाने क्रांतिकारी विचार बोथट झाला आहे. आंबेडकरी नेतृत्वाच्या नावाखाली बिगर-सरकारी संघटनांचे पीक जोरात आले आहे. कामगार आहेत; पण कामगार चळवळ दिसत नाही. आंबेडकरी लोकांचा जमाव आहे; पण नेतृत्व दिसत नाही. दलित पँथरच्या उदयासाठी १९७०च्या वेळी जी परिस्थिती होती, नेमकी तशीच परिस्थिती आज आहे. पण नवीन नेतृत्व उदयाला येताना दिसत नाही. या नेतृत्वाला एवढा क्रांतिकारी वारसा असताना असे का व्हावे? चळवळीतून नेतृत्व उभे का राहत नाही? यासाठी संपूर्ण आंबेडकरी समाज जबाबदार आहे. रिपब्लिकन नेत्यांना शिव्याशाप देऊन आपण मात्र नामानिराळे राहायचे अशी फॅशन आंबेडकरी समाजात रूढ झाली आहे. आंबेडकरी अनुयायांचे कुठेतरी चुकतेच हे लोक मानायला तयारच नाहीत. डॉ. आंबेडकरांच्या नावावर लोक जमतात, पण त्याचे नेतृत्वात रूपांतर होत नाही. तथापि, सुट्या सुट्या विषयावर चळवळी करताना लोक दिसतात. आंबेडकरी नेतृत्वातील संघटन (मोबिलायझेशन) हे पारंपरिकतेच्या परिघात अडकून पडले आहे. 'नातीगोती' व 'जातीच्या' आधारावरच आंबेडकरी नेतृत्वात मोबिलायझेशन केले जाते. 'मॉडर्न मोड ऑफ मोबिलायझेशन' न अवलंबल्यामुळे एका जातीच्या पलीकडे आंबेडकरी नेतृत्व सरकायला तयार नाही. किबंहूना जातीच्या आधारावर चालवलेल्या राजकारणाला निवडणुकांत अपयश आले की मग संपूर्ण आंबेडकरी नेतृत्व संपले असा अर्थ काढला जातो. या नेतृत्वाला कमालीचे वेगळेपण आले आहे. आंबेडकरी नेतृत्व वा आंबेडकरी समाज योग्य नेतृत्व निर्माण करू शकत नाही याचा अर्थ काय होतो? याला पूर्ण आंबेडकरी समाज जबाबदार आहे. आंबेडकरी विचारप्रणालीचे रूपांतर व्यवहारात किती केले जाते हा एक वेगळा संशोधनाचा विषय होऊ शकतो.वर्तमान परिस्थितीत आंबेडकरी समाज झपाट्याने बदलत आहे. वास्तविक असे होणे अपरिहार्य आहे. आपापल्या सोयीनुसार प्रत्येकाने नेतृत्व सुरू केले आहेत. उदा. राजकारणी नेत्यांची राजकीयनेतृत्व, धम्माच्या क्षेत्रातील मंडळींची चळवळ, पांढरपेशा आंबेडकरी नेत्याची चळवळ, साहित्यिकांची त्यांच्या क्षेत्रातील चळवळ, दलित कामगार व आंबेडकरी स्त्रियांच्या नेतृत्व इ. आंबेडकरी समाजात अनेक घटकांच्या योगदानामुळे 'सामाजिक गतिशीलता आली आहे. या गतिशीलतेने काही अनपेक्षित परिणाम निर्माण केले आहेत. उदाहरणार्थ, ही मंडळी सामाजिक व्यवस्थेचे भाग होऊ पाहत आहेत. संघर्ष नको पण सामोपचाराने राहा असा संदेश ते देतात. नेतृत्वाच्या क्रांतिकारी जाणीवा बोथट करण्यासाठी यांचा फार मोठा हातभार लागला आहे. अशी मंडळी समाजात पूर्णपणे वगळलीही जात नाहीत वा त्यांचे सामीलीकरणही होत नाही परिणामी एक पेचपूर्ण परिस्थिती तयार झाली आहे. यातून मार्ग काढावा लागेल. कारण हा घटक नेतृत्वाचा महत्त्वाचा भाग आहे. आंबेडकरी समाजाच्या निरनिराळ्या स्तरांमध्ये जोपर्यंत शाश्वत स्वरूपाच्या आंतरक्रिया होणार नाहीत, तोपर्यंत या नेतृत्वास बळकटी येणार नाही.नेतृत्व चालविण्यासाठी संसाधने लागतात उदा. पैसा, ज्ञान, वेळ आणि सामाजिक भांडवल. हे देणार कोण? अशाप्रकारचे सामाजिक भांडवल सुस्थितीत असलेला स्तर पुरवू शकतो. सामान्य आंबेडकरी माणसाजवळ हे भांडवल नाही, पण त्याचा नेतृत्वातील सक्रिय सहभाग अत्यावश्यक आहे.वास्तविक पाहता आंबेडकरी नेतृत्वात

लोकशाहीला बळकटी मिळवून दिली आहे याची अनेक उदाहरणे देता येतील. आंबेडकरी समाजाचा निवडणुकीतील सहभाग, मोठ्या संख्येने मतदानात सहभाग, अन्यायाविरोधात संघर्ष इत्यादी.

**महत्व :**

भारतीय पातळीवर विचार करताना बाबासाहेबांचे नाव घेण्याचा प्रघात पडत आहे. जनमानसात रुजलेल्या महापुरुषांची नावे या ना त्या कारणाने सतत घेत असतात पुढे हे नावे घेत राहाणे, हे एक कर्मकांड बनून जाते. छोट्या मोठ्या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी महापुरुषांना वेठीस धरणे ही भारतीयांच्या दृष्टीने फारशी नावीन्यपूर्ण गोष्ट नाही, कारण येथील नेते खुद्द परमेश्वर आणि त्याचे अवतार यांना पोट भरण्यासाठी वेठीस धरल्याची आपली महान परंपरा आहे. त्यामुळे बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाचा महिमा भारतभर दुमदुमणे यापेक्षा त्यांच्या विचारांना आचाराच्या पातळीवर कसे आणता येईल, त्यादृष्टीने जनसंघटन कसे उभारता येईल आणि त्यांच्या कल्पनेतील आंबेडकरी समाज कसा निर्माण करता येईल, हे पाहणे अधिक महत्त्वाचे आहे. त्यासाठी एकीकडून बदललेल्या परिस्थितीचे मूल्यांकन करून आंबेडकरी नेतृत्वाला व्यवहाराचे व विचारांचे पाठबळ देऊन नेतृत्व राजकीय सत्तेत टिकविण्याची गरज आहे. कारण आर्थिक आणि प्रसिद्धीच्या मोहाला बळी पडलेले लोक डॉ. बाबासाहेबांचे अपुरे स्वप्न पूर्ण करण्याऐवजी केवळ चुकीच्या मार्गावर उभे असल्यामुळे घात होण्याची शक्यता अधिक निर्माण करीत आहेत. डॉ.आंबेडकरांनी अस्पृश्याच्या स्वातंत्र, स्वावलंबी, स्वाभिमानी व राजकीय नेतृत्वाची दिशा दिली. परंतु वेगवेगळ्या आंबेडकरी संघटनांचे जे आक्रमक नेतृत्व विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात निर्माण झाले होते, ते आता दिसत नाहीत. राष्ट्रीय आणि प्रांतिक राजकारणातूनही आंबेडकरी आवाज हरवला आहे. तो हरवलेला आंबेडकरी आवाज पुन्हा वर्तमान राजकीय, सामाजिक, आर्थिक परिस्थितीच्या उत्थानासाठी आवश्यक आहे.

**आंबेडकरोत्तर आंबेडकरी नेतृत्व :**

आंबेडकरोत्तर काळात मुख्यत: काही नेतृत्वाचा उदय झाला. त्यापैकी १९५७ मध्ये रिपब्लिकन पक्षाची स्थापना,१९७२ ला दलित पॅंथरचा उदय, तिसरा अन्याय व शोषणाविरुध्द लेखणीच्या माध्यमातून रोष प्रगट करीत जगाला आपली कैफियत सांगणारे दलित साहित्य तर चौथे बहुजनवादी भूमिका घेत निर्माण झालेली बामसेफ व बहुजन समाज पक्ष आणि पाचवे धम्मपरिवर्तन चक्राला गतिमान करण्याच्या ध्येयवेडाने पछाडलेल्या खंडीत धार्मिक संघटना. रिपब्लिकन पक्षाचे रचनाकार स्वत: बाबासाहेब आंबेडकर होते. परंतु १९५६ ला अचानक झालेल्या महापरीनिर्वाणामुळे रिपब्लिकन पक्षाची घोषणा त्यांना करता आली नाही. १९६२ च्या मध्यात झालेल्या निवडणुकामध्ये रिपब्लिकन पक्षाने आपल्या भविष्याची दमदार सुरुवात केली होती. पक्षाने उत्तर प्रदेश मध्ये अनुक्रमे ३ खासदार व ८ आमदार तर महाराष्ट्रात ३ आमदार, १९६७ च्या निवडणुकीमध्ये उत्तर प्रदेश मध्ये १ खासदार व १० आमदार तर महाराष्ट्रात ५ आमदार निवडून आले होते. मात्र हे यश पक्षाला पचविता आले नाही. रिपब्लिकन पक्षावरील वर्चस्ववादाच्या भांडणात पक्षाचा राजकीय ग्राफ तेजीने घसरू लागला. रिपब्लिकन पक्षाची गटातटात विभागणी करून भविष्यात हे गटतट कधीच एकत्र येणार नाही असे वाटते. ही राजकीय मंडळी आंबेडकरी समाजावरील अन्याया संदर्भात प्रतिक्रिया देण्याव्यतिरिक्त व बघ्याची भूमिका

घेण्याशिवाय काहीही करताना दिसत नाही. या पार्श्वभूमीवर दलित पॅन्थर उदयास आली. या पॅन्थर्सनी आंबेडकरी विचारांना मार्क्सवादाची जोड दिली होती. नामांतरासाठी डरकाळ्या फोडणारी व अत्याचार पिडीत गावात कोणतीही तमा न बाळगता प्रस्थापितांना थेट आवाहन देणारी पॅन्थर वैचारिक दुराभाव व सत्ताधारांच्या आमिषाला बळी पडत तिचेही रिपब्लिकन पक्षासारखी शकले झाली. पँथरला फोडण्यासाठी सत्ताधाऱ्यांच्या व्यूनीतीला आलेले यश म्हणजे नामदेव ढसाळ व राजा ढाले यांच्यात निर्माण झालेला वैचारिक दुरावा होता. तिसरीकडे आंबेडकरी साहित्य प्रवाहाचा उदय होत होता. आंबेडकरी विचाराने प्रेरित झालेल्या या साहित्याला दलित साहित्य या नावाने ओळखल्या गेले. भारतात या साहित्य चळवळीने एक नवी दिशा दिली. आंबेडकरी लेखक व विचारवंतानी आपल्या लेखणीद्वारे विषमतावादी समाज व राजकीय व्यवस्थेवर प्रहार करणे सुरु केले होते "अखिल भारतीय दलित साहित्य" या नावाने सुरु झालेला हा आंबेडकरी विचाराचा प्रवाहही रिपब्लिकन पक्षाप्रमाणे हेलपाट्या खात कसा नामशेष झाला हे कोणाला कळलेही नाही. या साहित्याने मोठा विचारवंत, सामाजिक व राजकीय असे प्रगल्भ नेतृत्व निर्माण केले नाही हे निराशाजनक आहे. आंबेडकरवादी वर्गाला एका नव्या नेतृत्वाची गरज भासू लागली होती. याच गरजेतून मा.कांशीराम यांचा उदय झाला. मा.कांशीराम व डी.के.खापर्डे यांनी बामसेफ ह्या संघटनेची १९७१ ला स्थापना केली तर १९८४ साली बहुजन समाज पक्ष स्थापन केला. याला "सामाजिक चळवळीतून राजकीय नेतृत्वाचा उदय" असे म्हणता येईल. मा.कांशीराम यांनी सांस्कृतिक व सामाजिक चळवळीपेक्षा राजकीय सत्तेला अधिक महत्व दिले. आंबेडकरी विचारतत्वाच्या हे उलटच होते. परंतु त्यांनी बाबासाहेब आंबेडकरांच्या "राजकीय सत्ता ही सर्व समस्यांची गुरुकिल्ली आहे" या घोष वाक्याचा शस्त्रासारखा वापर केला. महाराष्ट्रात हा प्रयोग यशस्वी होण्याची शक्यता कमी असल्यामुळे उत्तर प्रदेशची निवड करण्यात आली. सोशल इंजिनियरिंगच्या नावाखाली मायावतीने ब्राम्हणांच्या सहाय्याने सन २००७ ला सत्ता प्राप्त केली. याचा फायदा बहुजन समाज पक्षाला घेता आला नाही. भ्रष्टाचाराचा आरोप लागलेला नेता समाजाला दिशा व योग्य नेतृत्व देवू शकत नाही, हे मायावती प्रकरणातून स्पष्ट झाले आहे. तर दुसरीकडे महाराष्ट्रातील आंबेडकरी जनतेला राजसत्तेचे वेड नसून ती केवळ भूलथापेवर जगणारी जमात असल्याचे दिसते. "जयभीम बोलो और किधरभी चलो" असा महाराष्ट्रीयन आंबेडकरी जनतेचा महिमा आहे. याला "आंबेडकरी स्वाभिमानी बाणा" कसे म्हणता येईल?. महाराष्ट्रात आंबेडकरी जनतेला बाळासाहेब (प्रकाश) आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालीही गोलबंद होता आले नाही. देशात मागासवर्गीय समाजावर विविध सांस्कृतिक विचारधारेचा पगडा असल्यामुळे अखिल भारतीय स्तरावर आंबेडकरी नेतृत्व मूळ धरू शकले नाही. ती संपूर्णपणे कोणत्याही राज्यात विकसित झाली नाही. मा.कांशीराम यांच्यानंतर नेतेपदाची जी पोकळी निर्माण झाली ती अजूनही भरता आली नाही हे या नेतृत्वाचे दुर्देवच म्हटले पाहिजेत. जेथे जागरूक नेते आहेत ते आपल्या न्याय हक्कासाठी लढताना दिसतात. परंतु त्याकडे सरकारचे व प्रसारमाध्यमाचे साफ दुर्लक्ष असते. असुरक्षिततता व दबावामुळे राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक लढे लढता येत नाही. देशातील बहुजन समाजात वेगवेगळया विचारधारा अस्तित्वात असल्या तरी 'शोषित समाज' हा बाबासाहेब आंबेडकर यांचे नेतेपद स्वीकारून आंबेडकरी विचारात आपल्या प्रश्नांचे मूळ शोधीत असतो.

आज कोणत्या आंबेडकरी नेतृत्वाकडे आशेने बघता येईल? वास्तविकता बघितली तर निराशाच दिसेल. प्रत्येक संघटना अनेक गटात विभागल्या आहेत. राजकीय पक्षाचे तर बघायला नकोच. फुले आंबेडकरांचे नाव

घेणाऱ्या व त्यांना आपला मार्गदाता मानणारे नेते एकमेकाचे कट्टर शत्रू असल्या सारखेच दिसतात. तर विरोधी विचाराच्या गटाचा समूह त्यांना कट्टर मित्रासारखा वाटत असतो. त्यामुळे आंबेडकरी नेतृत्वाच्या यशाचे मापन शोधता येणे फार कठीण झाले आहे. दिशाहीन व नेते हीन झालेले नेतृत्व आजच्यासारखीच पुढच्या वर्तमानात चाचपडत जगणार याला कोण नाकारू शकेल?. नेतृत्वाला कार्याची, नीतीची, व तिच्या भविष्याची चिकित्सा व चिंतन करून सुधारण्याचे उपाय शोधून त्यात परिवर्तन वा बदल घडवणार नसेल तर आहे त्या दगडावर (नेतृत्वावर) हातोड्याने घाव घालणारे हात पुढेही घाव घालून नेतृत्वाला नेस्तनाबूत केल्याशिवाय राहणार नाहीत. देशाच्या वर्तमानकाळात ज्या घटना घडताहेत व त्याचे धोके समजण्याची लायकी असणारा सुशिक्षित वर्ग जर निद्रावस्थेत (झोपेत) राहू इच्छित असेल, प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध रस्त्यावर उतरू इच्छित नसेल तर आंबेडकरोत्तर आंबेडकरी नेतृत्वाचे भविष्य परत परत अंधारमय होत राजकीय सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक गुलामीच्या बेड्या पायात कधी अडकतील? हे सांगायला कोणत्याही भविष्यवेत्त्याची गरज नाही.

**निष्कर्ष :**

आंबेडकरी समूहाचे राजकीय, सामाजिक, आर्थिक, शिक्षण विषयक मूलभूत प्रश्न अजिबात सुटलेले नाहीत. तरीही वर्तमान दशकातील बदलत्या राजकीय परिस्थितीमध्ये एक संघटित शक्ती म्हणून आंबेडकरी नेतृत्वाचा आवाज क्षीण होत असल्याचे जाणवते. आंबेडकरवादी नेतृत्व आणि राजकीय पक्ष कमजोर झाल्याने हे झाले का? याला संपूर्ण आंबेडकरी समाज जबाबदार आहे का? की आणखी कशामुळे? वर्तमान आंबेडकरी नेतृत्व फार मोठ्या संभ्रमात सापडली आहे. कारण आज आंबेडकरी नेतृत्वाकडे आशेने बघल्यास वास्तविकता बघितली तर निराशाच दिसेल आंबेडकरी नेतृत्व संपले असा युक्तिवाद काही मंडळींनी सुरू केला आहे. सध्या प्रत्येक जातिसमूह आपली अस्मिता राजकीयदृष्ट्या प्रबळ करीत असताना हा प्रश्न अधिक तीव्रतेने समोर येतो...

**संदर्भ ग्रंथ :**

- दलित चळवळीचे एन जी ओ करण. डॉ.आंनद तेलतुमडे सुगावा प्रकाशन, पुणे ४११०३०
- आंबेडकरवाद : तत्त्व आणि व्यवहार डॉ. रावसाहेब कसबे सुगावा प्रकाशन, पुणे ३०
- जागतिकीकरण आणि दलीतांचे प्रस्न उत्तम कांबळे सुगावा प्रकाशन, पुणे ४११०३०
- महाराष्ट्र टाइम न्यूज पेपर
- लोकसता न्यूज पेपर